# साखर आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य,

साखर संकुल, शिवाजीनगर,पुणे-४११००५.

दुरध्वनी क्र.-०२०-२५५३८०४१/४२/४३/४४ https://www.mahasugarcom.gov.in

फॅक्स क्र.- ०२०-२५५३८४९७ commsugar.fin@gmail.com


---

जा.क्र.साआ/कक्ष-७/अर्थ-१/155 अंतर्गत वसुली धोरण_/सन २०१९, दि: २७ सप्टेंबर, २०१९.

## -: परिपत्रक :-

**विषय :- सहकारी साखर कारखान्यांना देय असलेल्या शासकीय अर्थसहाय्याचा बोजा संबंधित कारखान्यांच्या मालमत्तेवर नोंदविणे तसेच महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम 155 अंतर्गत सहकारी साखर कारखान्यांकडील शासकीय अर्थसहाय्य वसुलीसाठी धोरण निश्चित करणेबाबत**

**संदर्भ** :- १) विविध शासन निर्णयाद्वारे सहकारी साखर कारखान्यांना देण्यात आलेले भागभांडवल, शासकीय कर्ज, शासन थकहमीवरील वित्तीय संस्थांचे कर्ज व शासन थकहमी

२) मा. सर्वोच्च न्यायालय, दिल्ली यांचेकडील Union of India v/s SICOM & others या प्रकरणामध्ये Civil Appeal No-१३००४/२००७ व संलग्न Civil Appeal No.७१३२/२००८ (Arising out of SLP CC) No.२११३७/२००७ खाली आदेश दिनांक- ०५/१२/२०१८

३) मा. उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद येथील M/S Ghrushneshwar Sugar Ltd v/s Union of India & others या प्रकरणामधील Writ Petition ९८२०/२०१८

महाराष्ट्र राज्याने कृषि औद्योगिक धोरण स्विकारले असून सदर धोरणातंर्गत शेतमालावर प्रक्रिया करणारे उद्योग ग्रामीण भागात निर्माण करणेस राज्य शासनाने प्रोत्साहन दिलेले आहे. सदर प्रोत्साहन योजने अंतर्गत राज्य शासनाने सहकारी साखर कारखाने, सुतगिरणी, कृषिप्रक्रिया संस्था इत्यादींना शासकिय अर्थसहाय्य देणेचे धोरण स्विकारले आहे.

सदर धोरणातंर्गत या प्रकारच्या सहकारी संस्थांना शासकीय भागभांडवल, शासकीय कर्जे, वित्तीय संस्थांच्या कर्जांना शासन थकहमी देणे व सदर कर्जास हमीशुल्क आकारणे, बिनव्याजी ऊस खरेदीकर कर्ज, विविध प्रकारची अनुदाने इत्यादी प्रकारचे अर्थसहाय्य सहकारी साखर कारखान्यांना देण्यात येते.

साखर कारखान्यांना उभारणीकरिता दिलेल्या शासकीय भागभांडवलाचा प्रथम हप्ता १० वर्षानंतर व उर्वरित हप्ता १५ व्या वर्षाच्या शेवटी संस्थेस नफा असल्यास लाभांशासह परतफेड करणे अभिप्रेत व आवश्यक आहे. त्याचप्रमाणे सहवीज व इतर उपप्रकल्प उभारणीकरिता शासकिय भागभांडवल प्राप्त झाले असल्यास ५

वर्षानंतर प्रथम हप्ता व १० वर्षानंतर दुसरा हप्ता त्यावरील लाभांशासह परतफेड करणे अभिप्रेत व आवश्यक आहे. या संदर्भात शासनाने वेळोवेळी या संदर्भातील अटी व शर्ती मध्ये सुधारणा केल्यास त्यादेखील लागू राहणार आहेत. शासकीय रकमेची एकरकमी परतफेड करणे सहकारी साखर कारखान्यांना अडचणींचे असल्यास नफा विभागणी मधून 'भाग विमोचन निधी' (Govt.Share capital Redemption fund) निर्माण करून त्या मधून शासकीय भाग भांडवलाची परतफेड करणे अभिप्रेत आहे.

शासकीय कर्जे ही ठराविक व्याज दराने/ बिनव्याजी सहकारी साखर कारखान्यांना देणेत येतात. परंतु सदर कर्जमंजुरी शासन निर्णयातील अटी व शर्तीनुसार कारखान्याच्या स्थावर मालमत्तेवर तेवढ्या रकमेचा बोजा नोंदविण्यात येणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे शासन हमी वरील कर्जे सहकारी साखर कारखाने वेळेत परतफेड करीत नसून शासन निर्णयातील अटीनुसार शासन हमीशुल्क शासनास अदा केले जात नाही. सदरची कर्जे वित्तीय संस्थांनी शासन हमीवर दिलेली असलेने कारखान्यांनी विहीत मुदतीत घेतलेल्या कर्जाच्या देय हप्त्याची परतफेड न केल्यास संबंधित बॅंका/ वित्तीय संस्थामार्फतच शासन हमी आव्हानित केली जाते. पर्यायाने शासनास सदर थकीत कर्जाची, व्याजासह रक्कम वित्तीय संस्थांना अदा करावी लागते. तसेच शासनास हमी शुल्काद्वारे मिळणारे उत्पन्न ही शासनास प्राप्त होत नाही त्यामुळे शासनास अनावश्यकपणे आर्थिक भुर्दड सोसावा लागतो.

शासकीय भाग भांडवल व त्यावरील लाभांश शासकीय कर्जे व त्यावरील व्याज आणि शासन हमी शुल्क इत्यादी देय शासकीय अर्थसहाय्य महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १५५ मधील तरतुदीनुसार कारवाई करून वसुली करण्याची तरतूद आहे. तथापि देय अर्थसहाय्याच्या रकमेचा बोजा कारखान्याच्या स्थावर मालमत्तेवर नोंदविला जात नाही. त्यामुळे देय शासकिय अर्थसहाय्य वसुली कारवाईची अंतिमरित्या साध्य (Logical Ends) होत नाही.

बंद किंवा आजारी सहकारी साखर कारखान्यांवर महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम 1960 मधील तरतुदी नुसार प्रशासक किंवा अवसायकाची नियुक्ती करणेत येते. अशाप्रकारे कारखान्याच्या संचालक मंडळाचे विनंतीनुसार प्रशासक नियुक्त करून असे कारखाने शासनाचे धोरणानुसार भाडेतत्वावर चालविणेस देणेत येतात तसेच शासनाचे धोरणानुसार संबंधित अवसायकाकडुन अशा प्रकारचा प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर असे कारखाने भाडेतत्वावर चालविणेस देण्यात येतात अशा कारखान्यांना भाडेपट्टयाचे माध्यमातून महसुली उत्पन्न मिळते. अशा सहकारी साखर कारखान्यांवर शासकीय देय बाकीचा बोजा नोंदविला गेलेस भाडेपट्ट्यातून शासकीय देय बाकी वसुल होवू शकते. त्याचप्रमाणे सहकारी साखर कारखाने सहभागी तत्वावर देताना, विक्री करताना, अन्य प्रकारे हस्तांतरित करताना किंवा बहुराज्यीय कायद्यांतर्गत नोंदणी करताना, सहकारी

कारखान्याचे खाजगी कारखान्यात रूपांतर करताना शासनाच्या देय रकमांचे संरक्षण होणे व शासनाच्या आर्थिक हिताचे रक्षण होणे आवश्यक आहे.

उपरोक्त बाबीचे अवलोकन करता शासकीय देयबाकीची वसुली करणेस्तव खालीलप्रमाणे कृती कार्यक्रमानुसार कार्यवाही करावी.

**अ) दिनांक ३१/०३/२०१९ अखेर शासनास देय असलेल्या सर्व रकमांच्या नोंदी/ बोजा कारखान्याच्या मालमत्तेवर नोंदविणेबाबत**

| अनु. क्र. | करावयाची कार्यवाही | कार्यवाही कोणी करावयाची आहे | कालावधी |
|---|---|---|---|
| १ | दि.३१/०३/२०१९ अखेर सहकारी साखर कारखान्यांकडून शासनास देय असलेल्या सर्व रकमांचा बोजा संबधित कारखान्याच्या स्थावर मालमत्तेवर नोंदविण्यासाठी कलम १५५ (१) नुसार अंतिम आदेश पारित करावेत.<br>**<u>पुरक कार्यवाही :-</u>**<br>बोजा नोंदविणेपूर्वी स्थावर मालमत्तेचा तपशिल संबंधित गावकामगार तलाठी व https://mahabhumi.gov.in पोर्टलवरून कारखान्याच्या स्थावर मालमत्तेचे ७/१२ व ८ अ चे उतारे प्राप्त करून घ्यावेत. | प्रादेशिक सहसंचालक (साखर) (महाराष्ट्र शासन सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग राजपत्र दि.०४/०१/२००७ नुसार प्रदान केलेल्या अधिकारान्वये) | **माहे ३० नोव्हेंबर २०१९** |

**ब) शासकीय देय रकमांची वेळोवेळी वसुली करण्यासंदर्भात कालबध्द वार्षिक वेळापत्रक**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | शासकीय देय बाकीच्या नोंदवह्या (Govt.dues Ledgers) सहकारी साखर कारखान्यांकडुन अद्ययावत करुन घेऊन, सदर नोंदवह्या संबंधीत विशेष लेखापरीक्षक वर्ग 1 (साखर) यांचे कडुन पडताळणी करुन घेणेत याव्यात. पडताळणी करताना संबंधित शासन निर्णयाप्रमाणे नेमकी वसुलपात्र रक्कम प्रमाणित करणे.<br>**<u>पुरक कार्यवाही :-</u>**<br>1) अशा प्रकारच्या नोंदवह्या (Govt. dues Ledgers) प्रादेशिक सहसंचालक (साखर) स्तरावर देखील सर्व संबंधितांच्या स्वाक्ष-यांसह अद्ययावत करुन घेणे.<br>2) उपरोक्त नुसार शासकीय देय बाकीच्या नोंदवह्यांची पडताळणी करताना शासकीय | 1) प्रादेशिक सहसंचालक (साखर)<br>2) विशेष लेखापरीक्षक वर्ग 1 (साखर) | **माहे एप्रिल** मध्ये |

| | | | |
|---|---|---|---|
| | अर्थसहाय्य मंजूरी शासन निर्णय/आदेशातील सर्व अटी व शर्तीची पूर्तता झाली आहे किंवा कसे याबाबत पडताळणी करुन याबाबत वस्तुस्थिती दर्शक अहवाल प्राप्त करून घेणे. | | |
| २ | शासकीय देय बाकीची प्रपत्रे अ, ब, क, ड, ई आयुक्तालयास विहित पध्दतीने व विहित नमुन्यात माहे एप्रिलमध्ये संबंधित प्रादेशिक सहसंचालक (साखर) यांचे मार्फत सादर करणे.<br>**<u>पुरक कार्यवाही :-</u>**<br>सदर प्रपत्रातील माहिती शासकीय देय बाकीच्या नोंदवह्या सोबत जुळत असल्याची खात्री करावी. | विशेष लेखापरीक्षक वर्ग 1 (साखर) | प्रत्येक वर्षी **माहे एप्रिल** अखेरीस |
| ५ | आर्थिक वर्षाअखेरची शासकीय देय बाकीची मागील थकबाकी अधिक चालू वसुलपात्र अशी एकूण मागणी निश्चित करणे. | प्रादेशिक सहसंचालक (साखर) | प्रत्येक वर्षी **माहे मे** अखेरीस |
| ६ | कारखान्याचे स्थावर व जंगम मालमत्तेचा कारखान्याने केलेल्या गुंतवणूकीचा व बँक खात्याबाबत या अद्ययावत तपशिल कारखान्याचे कार्यकारी संचालक व संबंधित वैधानिक लेखापरिक्षक यांचे संयुक्त स्वाक्षरीने व विशेष लेखापरीक्षक वर्ग 1 (साखर) यांचे पडताळणी अहवालासह प्राप्त करुन घ्यावा.<br>**<u>पुरक कार्यवाही :-</u>**<br>सदर स्थावर मालमत्तेपैकी वित्तीय संस्थांना तारण दिलेली व तारण नोंदलेली निर्वेध मालमत्ता (Free hold) मालमत्तेचा तपशिल संकलीत करुन कार्यालयात जतन करावा. यासाठी कार्यक्षेत्रातील **साखर कारखान्यांची निर्वेध मालमत्तेची नोंदवही** तयार करून जतन करावी. | 1) प्रादेशिक सहसंचालक (साखर)<br>2) विशेष लेखापरीक्षक वर्ग 1 (साखर) | प्रत्येक वर्षी **माहे जुन** |
| 6 | आर्थिक वर्षाअखेरची शासकीय देय बाकीची निश्चित केलेली मागणी रक्कम संबंधित कारखान्यास मागणी नोटीस बजावून रक्कम वसुली करणे. | प्रादेशिक सहसंचालक (साखर) | प्रत्येक वर्षी **माहे जुलै** |
| 7 | शासनाच्या देय रकमेपैकी वसूलपात्र रकमेच्या वसुलीसाठी कलम १५५ (१) नुसार अंतिम आदेश पारित करणे व वसुली करणे. | प्रादेशिक सहसंचालक (साखर) | प्रत्येक वर्षी **माहे ऑगस्ट व सप्टेबर** |
| ८ | अशाप्रकारे बोजा नोंदविलेनंतर वरील नुसार कारवाई सुरु झालेनंतर जमीन महसुलाची थकबाकी समजून वसुलीस्तव महाराष्ट्र महसुल | प्रादेशिक सहसंचालक (साखर) | कार्यवाही पूर्णत्वास येईपर्यंत |

| | | | |
|---|---|---|---|
| | संहिता १९६६ आणि त्या खालील नियम १९६७ नुसार जप्ती, विक्री व वसुली कारवाई करणेत यावी. | | |

शासकीय अर्थसहाय्याच्या वसुलीबाबत उपरोक्त नुसार टप्पानिहाय कारवाईचा कालबध्द कृति कार्यक्रम तयार करुन त्यास साखर आयुक्तालयाची मान्यता घेवून त्याप्रमाणे शिघ्रगतीने विनाविलंब कारवाई करणेत यावी.

(शेखर गायकवाड)
साखर आयुक्त,
महाराष्ट्र राज्य,पुणे.

**<u>प्रत माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी :-</u>**

1) संचालक (प्रशासन) साखर आयुक्तालय यांना या विषयावर संनियंत्रण ठेवण्यासाठी
2) प्रादेशिक सहसंचालक (साखर) (सर्व)
3) विशेष लेखापरीक्षक वर्ग 1 (साखर) (सर्व)

**<u>प्रत सविनय सादर :-</u>**

मा.प्रधान सचिव (सहकार), सहकार,पणन व वस्त्रोद्योग विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई.